# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.

E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक: 2अ/एडीएम/2014/ १३९५

दिनांक: 22 JUL 2014

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : विकलांग उमेदवारांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी असलेल्या सवलतींबाबत....

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येणा-या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी शारिरिक दृष्टया विकलांग उमेदवारांसाठी ३ टक्के राखीव जागा ठेवण्यात येतात. यासंबंधी प्रवेश नियमावली मध्ये नियम क्रमांक ४.३ मध्ये तरतूद स्पष्ट करण्यात आली आहे. प्रवेश नियमावलीच्या नियम क्रमांक ४.३ मध्ये देण्यात आलेल्या टिप्पणीमध्ये (पान क्रमांक १८) It should be noted that the Persons with Disablility candidates on admission to Engineering /Technology degree course will not be given any exemptions or additional facilities in the academic activities other than those which may be provided by the respective Universities असे नमूद केलेले आहे.

तथापि या संदर्भात शासन परिपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक यूएससी २००४/(८६/०४)/विशि-४, दिनांक ७ .८.२००४ अन्वये शासकीय /शासन अनुदानीत /व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अकृषी विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातील/ अभियांत्रिकी / तंत्रनिकेतने /अध्यापक महाविद्यालये इत्यादीमधील अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना दयावयाच्या सवलतींबाबत शासनाने आदेश निर्गमित केलेले आहेत. (आदेश सोबत जोडले आहेत.) प्रवेश नियमावलीतील वरील तरतूदीऐवजी सदर आदेश विचारात घेऊन कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिनस्त असलेल्या अभियांत्रिकी पदवी व पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात यावे.

(डॉ.सुभाष महाजन)

संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत :

०१. माहिती तंत्रज्ञान कक्ष,कार्यासन क्रमांक ३,मुख्य कार्यालय,मुंबई यांना कळविण्यात येते की, पुढील शैक्षणिक वर्षाचे प्रवेश नियमावेळी उपरोक्तप्रमाणे तरतूद होणेसाठी संबंधितांना कळविण्यात यावे.

०२. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.१०, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना

---

पृष्ठांकन/तंशिस/प्राकाना/शैवि/२०१४/ 2406

दिनांक:- 24 JUL 2014

प्रति,

संचालक/प्राचार्य

सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविका तसेच तस्सम संस्था,

नागपूर विभाग, नागपूर

**विकलांग उमेदवारांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी असलेल्या सवलतीबाबत ची कार्यवाही उपरोक्त पत्रात नमुद केल्यानुसार करण्यांत यावी.**

(गुलाबराव ठाकरे)

सहसंचालक,

तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,

नागपूर.